बुक-पोस्ट

श्री. / श्रीमती ________________

________________

________________

________________

अमर हिंद मंडळ
अमरवाडी,
गोखल पथ (उत्तर),
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

(स्थापना : १९४७)

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई)
संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५६ १९४९)

## वार्षिक अहवाल

## १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २०००

अमरवाडी
गोखल पथ (उत्तर)
दादर, मुंबई - ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ३५ ८९

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २०००


| | | |
|---|---|---|
| विश्वस्त | : | श्री. दिनकर शं. पाटील |
| | | श्री. मुकुंद आ. तिवरेकर |
| | | श्री. एकनाथ ना. साटम |
| अध्यक्ष | : | श्री. शंकरराव ना. साळवी |
| उपाध्यक्ष | : | श्री. मधुकर ज. फडके |
| | | श्री. रमेश मा. वरळीकर |
| कार्याध्यक्ष | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| कार्योपाध्यक्ष | : | श्री. अरुण अ. देशपांडे |
| कार्यवाह | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| स. कार्यवाह | : | श्री. सतीश श. रेडीज |
| कोषाध्यक्ष | : | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| सदस्य | : | श्री. दीपक ना. पडते |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. विनोद शं. हडप |
| | | श्री. चारुदत्त शां. धरवल |
| | | श्री. किशोर आ. पालेकर |
| | | सौ. उषा श. मेहता |
| | | श्री. दत्ता अ. सावंत (स्वीकृत) |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर (स्वीकृत) |


# अमर हिंद मंडळ, दादर

मुंबई - ४०० ०२८

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ७ जानेवारी २००१ रोजी सकाळी १०.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव ना. साळवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

पुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२. वार्षिक अहवाल (सन १९९९-२००० सालचे) मंजूर करणे.
३. हिशेब व ताळेबंद (सन १९९९-२००० सालचे) मंजूर करणे.
४. हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. सन २००१ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
६ इमारत निधीत व वंसत व्याख्यानमाला निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.
७. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांचा विचार करणे.

दि. १/१२/२००० — कार्यकारी समितीच्या अनुमतीने

उमेश व्यं. शेणॉय

कार्यवाह

सूचना :

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास घटना-नियमानुसार ही सभा त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर होईल.
२. सभासदांना हिशेबासंबंधी माहिती हवी असल्यास ती कार्यालयीन वेळेत (सायंकाळी ६ ते ८ पर्यंत) शनिवार दिनांक २३ डिसेंबर २००० पर्यंत मिळेल.
३. ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरूपात शनिवार दिनांक ३० डिसेंबर २००० पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान (रविवार सोडून) आणून द्यावेत.
४. ज्या सभासदांचे पत्ते बदलले असतील त्यांनी त्यांचे बदलेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी / संबंधितानी मंडळास तद्संबधीची माहिती त्वरित कळवावी.

# * वार्षिक अहवाल *
# दि. १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २०००

**सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो**

**सादर वन्दे,**

मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणास सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत आपल्या बहुमोल सहकार्याने तसेच अनेक हितचिंतकांकडून मिळालेल्या हार्दिक सहयोग आणि आर्थिक पाठबळामुळे मंडळाचे अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडाविषयक तसेच बहुविध सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या कार्यवाहीत आणले गेले. या सर्व कार्यक्रमांना चांगलाच प्रतिसाद आणि प्रसिध्दीही लाभली.

मंडळाच्या कार्यकारी समितीने वर्षारंभी खालील भविष्यकालीन योजना डोळयासमोर ठेवलेल्या होत्या.

- मंडळाच्या नवीन वास्तुची बांधकाम योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्नशील राहाणे. त्यासाठी मंडळाची आर्थिक स्थितीहि मजबूत करणे.
- विविध कार्यक्रमाव्दारे मंडळाच्या नावलौकिक वाढवणे.

बांधकामाच्या कामात अजूनहि काही शासकिय तसेच कुर्ला चर्चकडून काही बाबीसंबंधी कार्यवाही बाकी असल्याने इच्छा असूनहि कामास सुरुवात करता आलेली नाही.

अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवून देखील मंडळाची आर्थिक स्थिती आजही समाधानकारक आहे हे आपणांस जमाखर्च / ताळेबंदपत्रकावरून विदीत होईल. मंडळाने वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची जी कार्यवाही केली त्यांना वृत्तपत्रे आणि इतर प्रसारमाध्यव्दारे मिळालेल्या प्रसिध्दीमुळे मंडळाच्या नावलौकिकात निश्चित भर पडली आहे.

मंडळाच्या वार्षिक कार्याचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.





**सभा** : वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या एकूण ७ सभा झाल्या, कार्यकारी समिती व विश्वस्त यांची १ संयुक्त सभा झाली. (सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट १ पान १९ पाहा.)

**तह्हयात सभासद** : या कालावधीत एकही नवा तह्हयात सभासद नोंदविण्यात आला नाही.

**इमारत निधी** : अहवाल काळात रु. ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आले. तसेच रु. ३,००,०००/- (रुपये तीन लाख फक्त) वसंत व्याख्यानमाला निधीत वर्ग करण्यात आले.

**केटरिंग व्यवस्था** : दिनांक ३० जून १९९९ रोजी हार्दिक केटरर्स आणि डेकोरेटर्स यांची मुदत संपत असल्या कारणाने दिनांक १ ऑगस्ट १९९९ ते ३१ डिसेंबर २००० या दरम्यानच्या काळासाठी वर्तमानपत्रातून जाहिरात देवून निविदा (पूर्ण केटरिंग तसेच डेकोरेशन या दोन्ही बाबींसाठी) मागविण्यात आल्या. आलेल्या निविदामधून विकी केटरर्स आणि डेकोरेटर्स यांना पूर्ण ठेकेदारी देण्यात आली. १ जानेवारी २००० ते ३० जून २००० पर्यंत त्यांच्या कामाचे मूल्यमापन करुन पुढील ६ महिन्यासाठी त्यांना मुदत वाढ देण्यात आली.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ५२ वी वसंत व्याख्यानमाला दिनांक १८ एप्रिल ते २७ एप्रिल १९९९ या दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन कविवर्य शंकर वैद्य यांच्या ‘कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या कविता’ या विषयावरील व्याख्यानाने झाले. यानंतर विविध विषयांवरील एकूण नऊ व्यासंगपूर्ण व्याख्याने झाली. समारोप माजी केंद्रीय मंत्री श्री. मोहन धारीया यांच्या व्याख्यानाने झाला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ठ २ पान २० पाहा) पहिल्या दिवसापासूनच व्याख्यानमालेला भरपूर श्रोतृवृंद उपस्थित होता.

# क्रीडा विभाग

प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही मंडळाचे खोखो व कबड्डी संघ विविध स्तरीय गटांच्या स्पर्धांतून खेळले. काही ठिकाणी खेळांडूनी अंतिम फेरी तर काही ठिकाणी उपांत्य फेरी पर्यंत संघानी मजल मारली. सर्वसाधारणपणे खेळाडूंची कामगिरी प्रगतीपथावर आहे.

**वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी पुढील प्रमाणे आहे.**

## (अ) सांघिक

<u>खोखो</u> - दरवर्षा प्रमाणे यंदाही आपल्या महिला संघाला मुंबई, सोलापूर, औरंगाबाद, ठाणे, महापौर चषक, स्पर्धांचे आमंत्रण आले. ठाण्याची राष्ट्रीयस्तर तर इतर तीन स्पर्धा राज्य स्तरीय होत्या. मुंबई महापौर चषक स्पर्धेत आपल्या संघाला ३ रा क्रमांक मिळाला. इतर तीन स्पर्धांतून आपला संघ पूर्ण ताकदीनीशी खेळू शकला नाही. त्यामुळे संघाची मजल उपउपांत्यफेरी पर्यंतच पोचली.

मु. शा. शि. मंडळाने आयोजित केलेल्या जिल्हा स्तरीय वयोगट स्पर्धेत मुली (१६ वर्षांतील) व किशोर (१४ वर्षांतील) गटात मंडळाच्या खेळाडूंना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत महिला संघाला ३ रा क्रमांक मिळाला.

माहिम येथील 'ओम भारत व्यायाम' या संस्थेने आयोजित केलेल्या किशोर गटाच्या स्पर्धेचे उपविजेतेपद मंडळाच्या संघाने पटकावले.

<u>कबड्डी</u> - मुंबई (शहर) जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेतील किशोर गटाचे उपविजेतेपद मंडळाच्या मुलांनी पटकावले. विशेष म्हणजे या गटात यंदा ८० संघाचा सहभाग होता.

मु.शा.शि.मं. ने आयोजित केलेल्या 'ब' श्रेणी पुरुष गटाचे अजिंक्यपद मंडळाच्या खेळाडूंनी निर्विवादपणे संपादन केले. याच संस्थेच्या मुलींच्या वजनी गटात उपविजेतेपद पटकावून नवोदित खेळाडूंनी नव्या आशा निर्माण केल्या आहेत.

स्थानिक स्पर्धांतून आपले संघ सातत्याने खेळत असतात. उपउपान्त्य व उपांत्य फेरीपर्यंत मजल मारुन चमकदार खेळाचे प्रदर्शन करीत असतात. दोन ठिकाणी मंडळाच्या महिलांचा, शिस्तबध्द संघ म्हणून गुणगौरव झाला.



## अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई - २८

### ३१ मार्च २००० अखेरचे उत्पन्न व खर्च दाखविणारे पत्रक

| १९९८ - ९९ रुपये पैसे | उत्पन्न | १९९९-२००० रुपये पैसे |
|---|---|---|
| ४,१३,९७९.०० | सभागृह भाडे, व्हीडीओ शुटींग आणि केटरिंग कमिशन | ७,९९,६६५.०० |
| १,३४,४५१.०० | देणग्या | ३०,७१३.२५ |
| ३,०४,४८३.९२ | व्याज जमा | ४,०९,६१९.५७ |
| ३,०००.०० | इतर जमा | १२,१००.०० |
| २५,०००.०० | अनुदान (क्रीडा) | — |
| | पुढील पानावर | |

## अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई - २८

### ३१ मार्च २००० अखेरचे उत्पन्न व खर्च दाखविणारे पत्रक

| १९९८-९९ रुपये पैसे | खर्च | | १९९९-२००० रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | मागील पानावरुन | | |
| | <u>घसारा</u> | | |
| ७,५६७.०० | बिल्डिंग शेड | ७,१८९.०० | |
| २,९४९.०० | फर्निचर | ६,२६६.०० | |
| १,०७४.०० | डेड स्टॉक | ९१८.०० | |
| ४.०० | वैद्यकीय उपकरणे | ४.०० | १४,३७७.०० |
| ११,५९४.०० | | | |
| | <u>इतर कार्यक्रम खर्च</u> | | ७६४१.०० |
| ४,५०,०००.०० | बिल्डींग फंडाकडे / वसंत व्याख्यानमाला निधीकडे वर्ग | | ८,००.०००.०० |
| १७,५२८.६७ | खर्चापेक्षा अधिक जमा | | ८१,५८८.१७ |
| ८,८०,९१३.९२ | एकूण | | १२,५२,०९७.८२ |

दिनांक ३०-१०-२०००

**सु. ल. सराफ**
भागीदार : सराफ असोसिएटस् - चार्टर्ड अकौन्टन्टस



२००० रोजी केंद्रीय मंत्री माननीय श्री. मनोहर जोशी यांच्या हस्ते झाले. श्री. शेणॉय यांच्या या पराक्रमी उपक्रमाची प्रसिध्दी माध्यमांनी खास दखल घेऊन कौतुक केले.

◆ मंडळाचे कबड्डी प्रशिक्षक श्री. दिलीप भावे यांची बृहमुंबई शरीर सौष्ठव संघटनेच्या कार्यकारीणीवर निवड झाली. श्री. भावे हे शरीर सौष्ठवचे मान्यता प्राप्त राष्ट्रीय पंच आहेत.

◆ मंडळाचे खोखो प्रशिक्षक श्री. प्रफुल्ल (बाळा) पाटील यांची मुंबई (शहर) जिल्हा सब ज्युनियर गटाच्या निवड समितीवर तसेच किशोरी गटाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती.

मंडळाचे आजीव सभासद श्री. मनोहर साळवी यांना मराठी वृत्तपत्र लेखक [illegible]चा वि.ग. आठवले पुरस्कार मिळाला.

३) <u>क्रीडांगण :</u>

मंडळाचे क्रीडांगण व्यवस्थित करण्याचा मनोदय बरेच दिवस होता. यंदा तो पूरा झाला. दिवाळीच्या सुट्टीत बाहेरचे मजूर आणून क्रीडांगण १५ दिवसात तयार केले. या कामी खेळाडूंनी श्रमदानाचा मोठा हातभार लावला.

४) <u>दैनंदिन सराव :</u>

खोखो (पुरुष-मुले) श्री. रमेश नाटेकर, खोखो (महिला-मुली) श्री. प्रफुल्ल (बाळा) पाटील, कबड्डी (पुरुष-मुले) श्री. दिलीप भावे, कबड्डी (महिला-मुली) श्री. विजय राणे हे सराव घेत असतात. आवश्यक तेव्हा श्री. रमेश वरळीकर खोखोसाठी मार्गदर्शन करतात.

सुमारे १०० खेळाडूं पटावर आहेत. खाजगी शिकवणी वर्ग, शाळा/कॉलेज यांची वेळ आणि सरावाची वेळ यांचा मेळ जुळविणे दिवसेंदिवस अवघड होत आहे तरी [illegible]हा प्रशिक्षक व खेळाडूं श्रम घेत असतात.

## <u>इतर</u>

५) <u>खेळाडूं गौरव :</u>

१५ ऑगस्ट २००० स्वातंत्र्य दिनी हुशार विद्यार्थी खेळाडूंचा भेटवस्तु देऊन मंडळातर्फे गुणगौरव करण्यात आला. वार्षिक परिक्षेत किमान ६० टक्के गुण व सरावाची दैनंदिन उपस्थिती लक्षात घेऊन यंदा १३ खेळाडूंचे कौतुक करण्यात आले. अभ्यास व खेळ दोन्हीतील प्रगती उत्तम असावी अशी अपेक्षा खेळाडूंकडून आहे. या कल्पनेचे अनेकांनी स्वागत केले. प्रतिवर्षी अशा हुशार खेळाडूंची संख्या वाढती रहावी ही सदिच्छा!

## इतर कार्यक्रम

- ८ मार्च १९९९ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अंजार' निर्मित्त एका तमासगीर बाईच्या जीवनांवर आधारित असलेला एकांकीका नाटयाविष्काराचा गाजलेला कार्यक्रम 'तिच्या आईची गोष्ट अर्थात माझ्या आठवणींचा फड' मंडळातर्फे सादर केला गेला. सादरकर्त्या अभिनेत्री 'सुषमा देशपांडे' या होत्या

- भारतीय स्वातंत्र्याचा ५२ वा वर्धापनदिन रविवार दि. १५ ऑगस्ट १९९९ रोजी मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. शंकरराव साळवी यांच्या उपस्थितीत ध्वजवंदनाने साजरा करण्यात आला.

- रविवार दि. १४ नोव्हेंबर १९९९ रोजी जागतिक मधुमेहदिनानिमित्त अमर हिंद मंडळ, लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रीक्ट ३२३ अे-१, लायन प्रसाद पानवलकर आणि डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया (एस.एल. रहेजा हॉस्पिटल) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक डायबेटिक दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी मधुमेह जागरुकता प्रदर्शन, आहाराविषयी सल्ला, मधुमेह पुस्तिकेचे प्रकाशन तसेच ३५ वर्षावरील व्यक्तिंसाठी मोफत मधुमेह तपासणी इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद लाभला.

- भारताच्या प्रजासत्ताकदिन सोमवार दि. २६ जानेवारी २००० रोजी सकाळी मंडळाच्या पटांगणात जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक व माजी मंत्री सन्माननीय श्री. प्रभाकरजी कुंटे यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करुन साजरा करण्यात आला.

- सायंकाळी मंडळाच्या ५३ व्या वर्धापनदिनानिमित्त मंडळाचे सभासद, कार्यकर्ते, हितचिंतक, आश्रयदाते, आजीमाजी खेळाडूं आणि कलावंत यांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. या प्रसंगी 'श्रीचित्र चित्रलेखा' निर्मित राजकीय स्थितीवर गमतीदार भाष्य करणार खरंखूर नाटक 'शोभायात्रा' सादर करण्यात आले. या कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्तम प्रतीसाद लाभला.



संकीर्ण :

१) अहवाल काळात मंडळाच्या सभासदांच्या यादीचे नुतनीकरण करण्याची मोहीम हाती घेण्यात आली.

२) अहवाल काळात मंडळाने नवीन ३०० प्लास्टीक फोल्डींग खुर्च्या खरेदी केल्या.

३) मंडळातर्फे प्रतिवर्षाप्रमाणे दिवाळी भेटकार्डे सभासद, खेळाडूं, हितचिंतक व इतर मान्यवरांना पाठविण्यात आली.

## श्रध्दांजली

मंडळाचे तह्हयात सभासद आणि माजी कार्यकारी समिती सदस्य श्री गोविंदराव आवसक यांचे अहवालकाळात निधन झाले. मंडळाची त्यांना साश्रुपूर्ण श्रध्दांजली.

## अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई - २८

### ३१ मार्च २००० अखेरचे उत्पन्न व खर्च दाखविणारे पत्रक

| १९९८-९९ रुपये पैसे | खर्च | १९९९-२००० रुपये पैसे |
|---|---|---|
| ४०,३५०.०० | सेवक वेतन | ५०,४००.०० |
| ६४,०७१.०० | महानगरपालिका इतर कर | ५७,२७०.०० |
| १,३०,८४७.०० | विद्युत | २२,६९३.०० |
| १०,६६८.०० | इमारत व इतर दुरुस्ती | १४,१७८.०० |
| १,५७५.०० | कायदा / व्यवसाय कर सल्ला फी | १०,३७५.[illegible] |
| ४,४९४.०० | विमा | ४,४९४.०० |
| ४७५.०० | बँक चार्जेस | ६५९.०० |
| ७४७.०० | प्रवास खर्च | ७९८.५० |
| ६६७.०० | मिटींग व इतर खर्च | — |
| १८,०६२.०० | टेलिफोन | १२.१४८.०० |
| ८२०.०० | टपाल खर्च | १००.०० |
| — | व्यवसाय कर | ३,६९६.०० |
| ६,२५१.५० | छपाई व लेखन साहित्य | ७,०९१.०० |
| १४,३५१.०० | धर्मदाय आयुक्त कर | १५,१२३.०० |
| २,५००.०० | ऑडिट फी व आयकर सल्ला फी | १,५७५.०० |
| २६,९४२.२५ | क्रीडा विभाग | ५६,०६७.७५ |
| ६,६६७.०० | कला विभाग | — |
| — | जाहिरात | ५,३४०.०० |
| २८,९४०.०० | वसंत व्याख्यानमाला | १६,१६४.[illegible] |
| ३७,०३५.५० | प्रजासत्ताक व वर्धापन दिन कार्यक्रम खर्च | ५४,५८०.४० |
| — | महिला विभाग कार्यक्रम | |
| ३,६०१.०० | देणगी | २,००१.०० |
| २,७२७.०० | ग्राहक मार्गदर्शन कार्यक्रम | — |
| — | शैक्षणिक कार्यक्रम | १३,७३८.०० |
| | पुढील पानावर | |



मुलांच्या ५५ किलो वजनी गटाच्या ५ स्पर्धांतून मंडळाचा संघ उपांत्य उपविजयी ठरला. वसई येथील 'वाल्मीकी क्रीडा मंडळाच्या' आमंत्रितांच्या स्पर्धेत मंडळाचा महिला संघ अजिंक्य ठरला. माहिमच्या 'युवक क्रीडा मंडळाच्या' महिला गटाच्या स्पर्धेत संघ उपांत्य उपविजयी ठरला.

## (ब) वैयक्तिक

<u>खो खो</u>

<u>प्रसाद कांबळी</u> - मुंबई सब ज्युनियर संघात लागोपाठ तिसऱ्यांदा निवड. यंदा [illegible]धारपद भुषविले. मु.शा. शि. मं. च्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट अष्टपैलू किशोर म्हणून गुणगौरव.

<u>शुभदा धुरी</u> - मुंबई ज्युनियर तसेच खुला गट आणि महिला राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी महाराष्ट्र खो खो संघात निवड. मुंबई महापौर चषक स्पर्धेतील पहिल्या दिवसांची मानकरी.

<u>विशाखा सुर्वे</u> - महाराष्ट्र महिला संघात व मुंबई शहर (खुलागट) संघात निवड.

<u>प्रीती धुरी</u> - महाराष्ट्र शालेय संघात निवड. अजय स्पोटस् क्लब (वरळी) आयोजित जोड जिल्हा खो खो स्पर्धेतील पहिल्या दिवसाची मानकरी

<u>कविता धुरी</u> - महाराष्ट्र जुयनियर संघात निवड.

<u>श्वेता कांबळी</u> - महाराष्ट्र शालेय संघात निवड.

<u>[illegible]दा कदम</u> - मुंबई ज्युनियर संघात १३ वी व महाराष्ट्र शालेय (मिनी) संघात निवड.

<u>रोहन चव्हाण</u> - मुंबई सब ज्युनियर संघात निवड 'ओम भारत व्या. शा.' आयोजित जिल्हा स्तरीय किशोर गट स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ संरक्षक.
जतीन टाकळे, शीतल चोप्रा, वैशाली शेटये यांची मुंबई विद्यापीठ संघात निवड.

**रीचा फर्नांडीस :** मुंबई ज्युनियर संघात निवड.

**कबड्डी -**

**सचिन बिर्जे** - मुंबई ज्युनियर संघात निवड.

**साईनाथ काळसेकर** - मुंबई सब ज्युनियर संघात व महाराष्ट्र सब ज्यु. संघात १३ वा.

**कुणाल यादव** - 'मावळी मंडळ ठाणे' राज्य स्तरीय कबड्डी स्पर्धेतील पहिल्या दिवसाचा मानकरी.

**अलका पारकर** - 'मावळी मंडळ ठाणे' राज्य स्तरीय कबड्डी स्पर्धेतील पहिल्या दिवसाचा मानकरी. 'काळा चौकी गावदेवी क्री. म.' स्पर्धेत उत्कृष्ट चढाईची खेळा म्हणून गुणगौरव

**विनायक तोडणकर** - 'दुर्गामाता क्रीडा मंडळ (परळ)' ४५ किलो वजनी गटातील 'सर्वोत्कृष्ट चढाईचा खेळाडूं.

**आरती नार्वेकर** : मुंबई (शहर) ज्युनियर संघातील १३ वी खेळाडूं.

**संपती खांडेकर** : शिवसेना शाखा क्र. ९४ वडाळा खुलागट स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ चढाईची खेळाडूं.

**संध्या तोडणकर** : श्रीमती ना. दा. ठा. विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेतील सर्वोत्कृष्ठ चढाईची तर कॉलेजच्या सर्वोत्कृष्ठ अष्टपैलू खेळाडूं म्हणून गौरव.

## (क) इतर

१) क्रीडा शिष्यवृत्ती -

**प्रीती धुरी व श्वेता कांबळी** : महाराष्ट्र शासन राष्ट्रीय क्रीडा संस्था पतीयाळा व मुलुंडची सुभद्राबाई शिक्षण निधी या संस्थाची क्रीडा शिष्यवृत्ती ची मानकरी.

**कविता धुरी** : राष्ट्रीय क्रीडा संस्था पतीयाळा राष्ट्रीय शिष्यवृत्तीची मानकरी.

**अभिमानास्पद** : मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांनी लिहीलेल्या ऑलिम्पिक ओरिजीन टू सेंटनरी " या पुस्तकाचे प्रकाशन मंडळाच्या पटांगणात दिनांक १८ मार्च



## अमर हिंद मंडळ, दादर, मुंबई - २८

### ३१ मार्च २००० अखेरचे उत्पन्न व खर्च दाखविणारे पत्रक

| १९९८ - ९९ रुपये पैसे | उत्पन्न | १९९९-२००० रुपये पैसे |
|---|---|---|
| | मागील पानावरुन | |
| ८,८०,९१३.९२ | एकूण | १२,५२,०९७.८२ |

| चिं. वि नागले | उ. व्यं शेणॉय | श्री. शं. राणे |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | कार्यवाह | कोषाध्यक्ष |

(अमर हिंद मंडळासाठी)

## कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती
## (परिशिष्ट १)

| | १९९९-२००० |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | ७ |
| २) श्री. अरुण अ. देशपांडे (कार्योपाध्यक्ष) | ६ |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ६ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सं. कार्यवाह) | ७ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | ५ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ४ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | ६ |
| ८) श्री. विनोद शं. हडप (सदस्य) | ४ |
| ९) श्री. चारुदत्त शां. थरवल (सदस्य) | ७ |
| १०) श्री. किशोर आ. पालेकर (सदस्य) | ४ |
| ११) सौ. उषा श. मेहता (सदस्य) | ३ |
| १२) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ३ |
| १३) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | ६ |



परिशिष्ट (२)

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५२ वे)

## कार्यक्रम पत्रिका

रविवार : **उद्‌घाटक - कविवर्य शंकर वैद्य**
दि. १८-४-९९ **विषय** : *कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांची कविता*

सोमवार : **प्रा. निर्मलकुमार फडकुले**
दि. १९-४-९९ **विषय** : *तुकारामाचे बंडखोर व्यक्तित्व आणि कवित्व*

मंगळवार : **श्री. बिंदुमाधव जोशी**
दि. २०-४-९९ **विषय** - *ग्राहक चळवळीचा भारतीय विचार*

बुधवार : **श्री. द. शं. सोमण (माजी पोलीस महासंचालक)**
दि. २१-४-९९ **विषय** : *सद्यःस्थिती, कायदा आणि सुव्यवस्था*

गुरुवार : **श्री. शं. ना. नवरे यांची मुलाखत**
दि. २२-४-९९ *मुलाखत घेणारे श्रीमती स्मिता तळवलकर*

शुक्रवार : **श्री. प्रकाश अकोलकर (महाराष्ट्र टाइम्स)**
दि. २३-४-९९ **विषय** - *बातम्यातील माणसे*

शनिवार : **श्री. प्रकाश बाळ**
दि. २४-४-९९ **विषय** - *दिल्लीतील राजकीय भुकंप आणि त्याचे परिणाम*

रविवार : **डॉ. य. दि. फडके**
दि. २५-४-९९ **विषय** - भारतीय घटनेची ५० वर्षे

सोमवार : **प्रा. पुष्पा भावे**
दि. २६-४-९९ **विषय** - *नाटककार शिरवाडकर*

मंगळवार : **श्री. मोहन धारीया**
दि. २७-४-९९ **विषय** - *आर्थिक नीती व आत्मनिर्भर भारत*

●●●